सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष
कला शाखेच्या (T.Y.B.A.) २०१५-१६ च्या सुधारित अभ्यासक्रमानुसार
लिहिलेले क्रमिक पुस्तक, तसेच महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांना उपयुक्त.

# राज्यशास्त्र

## (आंतरराष्ट्रीय संबंध)




संपादक

प्रा. डॉ. कैलास सोनवणे

प्रा. डॉ. बाबासाहेब पवार
प्रा. अनिल मधाळे
प्रा. डॉ. रमेश रणदिवे
प्रा. पंढरीनाथ साळुंके
प्रा. भरत राठोड
प्रा. राहुल पंडित
प्रा. रविंद्र जोगदंड



आयडॉल !dol THE TEXT It's all about knowledge

!dol Publications

TAT14A Price - 125/-

Marketed By
Tech-Max Publications

# राज्यशास्त्र

## (आंतरराष्ट्रीय राजकारण)

## अनुक्रमणिका

### विभाग १


| | | |
|---|---|---|
| १. आंतरराष्ट्रीय राजकारण | प्रा. डॉ. कैलास सोनवणे | १.१–१.१२ |
| १.१ आंतरराष्ट्रीय राजकारण | | |
| १.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि व्याप्ती | | |
| १.३ आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी आणि वास्तववादी सिद्धांत | | |
| १.४ आदर्शवादी विश्वरचनेच्या निर्मितीसाठी आवश्यक उपाययोजना | | |
| २. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनाचे दृष्टिकोन | प्रा. डॉ. बाबासाहेब पवार | २.१–२.११ |
| २.१ आंतरराष्ट्रीय संबंधांचा सत्ता दृष्टिकोन | | |
| २.२ निर्णय ग्रहण दृष्टिकोन | | |
| २.३ व्यवस्था दृष्टिकोन | | |
| ३. सत्ता | प्रा. भरत राठोड | ३.१–३.०९ |
| ३.१ सत्ता | | |
| ३.२ राष्ट्रीय सत्ता | | |
| ३.३ राष्ट्रीय सत्तेचे बदलते स्वरूप | | |
| ४. सत्ता संतुलन | प्रा. अनिल मधाळे | ४.१–४.११ |
| ४.१ सत्ता संतुलन | | |
| ४.२ सत्ता संतुलनाची वैशिष्ट्ये | | |
| ४.३ सत्ता संतुलनाचे बदलते स्वरूप | | |
| ४.४ सत्ता संतुलनाची गृहिततत्त्वे | | |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेच्या (T.Y.B.A.) २०१५-१६ च्या सुधारित अभ्यासक्रमानुसार लिहिलेले क्रमिक पुस्तक, तसेच महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांना उपयुक्त.

# राज्यशास्त्र

## (आंतरराष्ट्रीय राजकारण)


### संपादक

**प्रा. डॉ. कैलास सोनवणे**
एम.ए., एम.फिल., सेट, पीएच.डी.
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे.

**प्रा. डॉ. बाबासाहेब पवार**
एम.ए., पीएच.डी.
कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूर,
ता. श्रीरामपूर, ता. अहमदनगर.

**प्रा. भरत राठोड**
एम.ए., एम.फिल., नेट
प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, पिंपरी, पुणे.

**प्रा. अनिल मधाळे**
एम.ए., नेट,
नौरोजी वाडिया महाविद्यालय, पुणे.

**प्रा. राहुल पंडित**
एम.ए., नेट
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,
जुन्नर, जि. पुणे.

**प्रा. डॉ. रमेश रणदिवे**
एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
महात्मा फुले महाविद्यालय,
पिंपरी, पुणे.

**प्रा. रविंद्र जोगदंड**
एम.ए., सेट
न्यू आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
शेवगाव, जि. अहमदनगर.

**प्रा. पंढरीनाथ साळुंके**
एम.ए., एम.फिल., बी.एड.
विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती, जि. पुणे.


Name of Student : ____________________ Roll No. : __________

Name of College : ____________________ Division : __________

TAT14A Price ₹ 125/-

प्रकरण ३

# सत्ता
## (Power)


३.१ सत्ता
- ३.१.१ सत्ता : व्याख्या
- ३.१.२ सत्ता : अर्थ
- ३.१.३ सत्तेचा इतिहास/पार्श्वभूमी
- ३.१.४ सत्तेचे प्रकार

३.२ राष्ट्रीय सत्ता
- ३.२.१ राष्ट्रीय सत्तेची संकल्पना
- ३.२.२ राष्ट्रीय सत्तेची वैशिष्ट्ये
- ३.२.३ राष्ट्रीय सत्तेचे घटक

३.३ राष्ट्रीय सत्तेचे बदलते स्वरूप


### प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर जगातील प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करते. यासाठी प्रत्येक राष्ट्र सत्तेचा वापर करीत असते. सर्वच राष्ट्रे आंतरराष्ट्रीय स्तरावर सत्तेचा वापर करीत असल्याने संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. हा संघर्ष म्हणजेच सत्ता संघर्ष असतो. या संघर्षात टिकून राहण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपल्याजवळ सत्ता असण्याची गरज वाटते. अगदी प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सत्तेचे अस्तित्व दिसून येते. सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी दृष्टिकोनाचा भाग आहे. राष्ट्राचे हितसंबंध जपण्याबरोबरच राष्ट्रीय सुरक्षेसाठीसुद्धा सत्ता आवश्यक असते. सत्ता, सामर्थ्य इत्यादींच्या आधारे एखाद्या राष्ट्राचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जा निर्धारित होतो. म्हणूनच विविध राष्ट्रांमध्ये सत्ता प्राप्तीसाठी संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. सत्तेच्या आधारे राष्ट्राला आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करता येते आणि आपले अस्तित्व टिकविता येते. अनेक राजकीय विचारवंतांनी राष्ट्रीय सत्तेला अत्यंत महत्त्वाचा घटक मानले आहे. सत्तेच्या मार्गाने हितसंबंधांची जपणूक हे राजनयाचे उद्दिष्ट असते. सत्तेचे महत्त्व प्राचीन काळापासून स्वीकारण्यात आले आहे. कारण सत्तेच्या आधारे राज्याला किंवा राष्ट्राला निर्विवादपणे आपले वर्चस्व प्रस्थापित करता येते. आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणातील वाटाघाटींमध्ये सामर्थ्यवान राष्ट्रे सरस ठरतात. ज्या राष्ट्रांकडे मोठ्या प्रमाणात सत्ता असते. ती राष्ट्रे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी ठरतात. पूर्वीच्या इतिहासाचा विचार करता राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून सत्ता या संकल्पनेचा उदय झालेला दिसतो. कालांतराने

या संकल्पनेचा विकास होत गेला. सद्यस्थितीत सत्तेचे अनेक प्रकार आढळतात. मात्र त्यामध्ये राष्ट्रीय सत्ता हा प्रकार महत्त्वाचा मानला जातो. या सत्तेचे अनेक घटक असतात. हे घटक सत्तेवर प्रभाव पाडत असतात. सत्ता ही केवळ एका घटकावर अवलंबून नसते तर सर्व घटकांचा एकत्रित प्रभाव सत्तेवर पडत असतो. मात्र या घटकांचे निश्चित असे मोजमाप नसते. आधुनिक काळात राष्ट्रीय सत्तेचे स्वरूप बदलत आहे. अनेक गोष्टी यासाठी कारणीभूत ठरतात. प्रामुख्याने आधुनिक काळात घडून आलेल्या बदलांमुळे सत्तेचे स्वरूप बदललेले आढळते. प्रस्तुत प्रकरणात आपण सत्ता या संकल्पनेविषयी सविस्तर जाणून घेणार आहोत.

## ३.१ सत्ता (Power)

राज्यशास्त्रातील 'सत्ता' ही संकल्पना महत्त्वपूर्ण मानली जाते. आधुनिक काळात या संकल्पनेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ३.१.१ सत्ता : व्याख्या :

**१) हेन्स जे. मॉर्गेन्थॉ :**

"मानवाचे इतर व्यक्तींच्या मनावर किंवा कृतीवर असलेले नियंत्रण म्हणजे सत्ता होय."

**२) आर. एच. टॉनी :**

"व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह यांच्या ठिकाणी अन्य व्यक्ती किंवा समूह यांच्या वर्तनात आपल्या इच्छेप्रमाणे बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय."

**३) कोसर व रोझेनबर्ग :**

"एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी तिच्या स्वतःच्या इच्छेनुसार इतरांचे वर्तन निश्चित करण्याची असलेली क्षमता म्हणजे सत्ता होय."

### ३.१.२ सत्ता : अर्थ :

दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संबंधांतून सत्तेची निर्मिती होते. ज्या व्यक्तीच्या हातात सत्ता असते ती व्यक्ती इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. सत्तेच्या आधारे इतरांच्या वर्तनावर प्रभाव पाडता येतो. त्याद्वारे त्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल करता येतो. व्यक्तिगत प्रभाव किंवा सामर्थ्य यांच्या आधारे सत्ता प्राप्त करून घेता येते.

### ३.१.३ सत्तेचा इतिहास/पार्श्वभूमी :

प्राचीन काळापासून सत्तेचे अस्तित्व दिसून येते. १७ व्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रराज्य ही संकल्पना अस्तित्वात आली. त्यासोबत सत्तेचा विकास झाला. मात्र त्याच्या खूप आधीपासून भारत आणि चीन या देशांमध्ये सत्तेला महत्त्व दिले गेले. या देशांमधील प्राचीन ग्रंथांमध्ये सत्तेचा उल्लेख आढळतो.

**१) भारत :**

भारतातील कौटिल्याचे अर्थशास्त्र, मनुस्मृती, महाभारतातील शांतीपर्व यामध्ये सत्तेचा उल्लेख आढळतो. राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी यामध्ये सत्ता आणि समर्थ्य यांवर भर देण्यात आला आहे. कारण या विचारवंतांच्या मते, राष्ट्रीय हितसंबंधाच्या रक्षणासाठी सत्ता हे प्रभावी साधन ठरते.

२) चीन :

भारताप्रमाणेच चीनमध्येसुद्धा प्राचीन काळापासून सत्तेचे अस्तित्व दिसून येते. सत्तेविषयीचे सविस्तर विवेचन चीनी विचारवंत सन त्यू यांच्या 'आर्ट ऑफ वॉर' या ग्रंथात आढळते. या ग्रंथात साम्राज्यविस्तारावर भर देण्यात आला आहे. साम्राज्यविस्ताराद्वारे सत्तेची वृद्धी करता येते असे त्यांचे म्हणणे आहे.

३) इटली :

मॅकिव्हेली या इटालियन विचारवंताने सत्तेचा वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यांच्या 'द प्रिन्स' या ग्रंथात हे विचार आढळतात. साम्राज्यविस्ताराच्या संदर्भात मॅकिव्हेलीने काही मार्गदर्शनपर सूचना केल्या आहेत. या सूचनांमध्ये सत्तेला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

४) युरोप :

१७ व्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रराज्य संकल्पनेचा उदय झाला. त्यातून राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला महत्त्व प्राप्त झाले. परिणामी सत्ताविस्तार करणे हा राष्ट्राचा अधिकार मानण्यात आला. या अधिकारानुसार सत्ताविस्तारासाठी उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करण्याची मुभा देण्यात आली.

### ◈ ३.१.४ सत्तेचे प्रकार :

सत्ता म्हणजे इतरांवर प्रभाव पाडण्याची क्षमता असते. ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. अनेक विचारवंतांनी सत्तेवर विवेचन केले आहे. जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये सत्तेचे अस्तित्व दिसून येते. त्यानुसार सत्तेचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. सर्व क्षेत्रांच्या केंद्रस्थानी सत्ता असते.

**१) भौतिक सत्ता :**

सत्तेचा एक महत्त्वाचा प्रकार म्हणून भौतिक सत्तेचा उल्लेख करता येतो. राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्यातून राष्ट्राची भौतिक सत्ता प्रतित होते. एखाद्या राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य जेवढे जास्त असते तेवढा त्या राष्ट्राचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रभाव जास्त असतो. किंबहुना लष्करी सामर्थ्यावर राष्ट्राचे अस्तित्व अवलंबून असते. एखाद्या राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य कमजोर असल्यास त्या राष्ट्राला स्वसंरक्षण करणे कठीण जाते. परिणामी त्या राष्ट्राला स्वसंरक्षणासाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. लष्करी सामर्थ्य जास्त असणाऱ्या राष्ट्राचा महासत्ता म्हणून उदय होतो.

**२) आर्थिक सत्ता :**

आर्थिक सत्ता म्हणजे आर्थिक सेवांच्या आधारे इतर राष्ट्रांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता होय. देशाच्या विकासाच्या दृष्टीने आर्थिक सत्ता महत्त्वाची असते. कारण आर्थिक सत्तेच्या प्रमाणात देशाचा विकास साधला जातो. आर्थिकदृष्ट्या विकसित राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त होते. आर्थिक विकासाच्या अवस्थेनुसार राष्ट्रीय सत्तेचे प्रमाण निर्धारित केले जाते. आर्थिकदृष्ट्या विकसित राष्ट्रे इतर राष्ट्रांना अर्थसहाय्य करू शकतात. त्याद्वारे आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे वर्चस्व प्रस्थापित होते.

**३) मानसिक सत्ता :**

लोकमतावरील सत्ता म्हणजे मानसिक सत्ता होय. या सत्तेमध्ये लोकांना भावनिक आवाहन केले जाते. या भावनिक आवाहनाद्वारे सत्तेच्या प्रति लोकांचे मत अनुकूल करण्यासाठी प्रयत्न केले जातात. लोकांना भावनिक आवाहन करण्यासाठी प्रचार तंत्राचा वापर केला जातो. तसेच महत्त्वाच्या प्रसंगी प्रत्येक राष्ट्र आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करते.

## ३.२ राष्ट्रीय सत्ता (National Power)

प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करते. हे हितसंबंध जपण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला सत्तेची गरज असते. वास्तववादी दृष्टिकोनातून सत्तेचा स्वीकार केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राची सत्ता महत्वाची ठरते. सत्ता ही राष्ट्राचे साधन आणि साध्य दोन्ही असते.

### ◈ ३.२.१ राष्ट्रीय सत्तेची संकल्पना :

**अ) राष्ट्रीय सत्ता : व्याख्या :**

**१) हार्टमन :**

"आपले राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्यासाठी राज्य उपयोगात आणत असलेली स्वतःची क्षमता म्हणजे राष्ट्रीय सत्ता होय."

**२) पेडलफोर्ड व लिंकन :**

"राज्याचे सामर्थ्य आणि क्षमता यांची एकत्रित गोळाबेरीज म्हणजे 'राष्ट्रीय सत्ता' होय."

**३) ऑर्गन्स्की :**

"राष्ट्राची इतर राष्ट्रांचे वर्तन प्रभावित करण्याची क्षमता म्हणजे राष्ट्रीय सत्ता होय."

**ब) राष्ट्रीय सत्ता : अर्थ :**

एखाद्या राष्ट्राची इतर राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याची क्षमता म्हणजे राष्ट्रीय सत्ता होय. प्रत्येक राष्ट्र आपली उद्दिष्टे गाठण्यासाठी राष्ट्रीय सत्तेचा वापर करते. सत्तेच्या आधारे एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित करणे शक्य होते. आपल्या लष्करी आणि आर्थिक सामर्थ्याच्या आधारे राष्ट्राला सत्ता प्राप्त करता येते.

### ◈ ३.२.२ राष्ट्रीय सत्तेची वैशिष्ट्ये :

**१) राष्ट्रीय सत्तेचे स्वरूप :**

विविध कारणांसाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता साधनाप्रमाणे उपयुक्त ठरते. प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करते. त्यासाठी राष्ट्रीय सत्तेचा वापर केला जातो. म्हणजेच राष्ट्रांचे हितसंबंध जपण्यासाठी राष्ट्रीय सत्ता हे साधन ठरते. याशिवाय प्रत्येक राष्ट्रासाठी राष्ट्रीय सत्ता प्राप्त करणे हे साध्य असते. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रत्येक राष्ट्र सत्ताविस्तारासाठी प्रयत्न करते. कारण सत्तेमुळे राष्ट्राचे सामर्थ्य वाढते.

**२) राष्ट्राची क्षमता :**

इतर राष्ट्रांवर वर्चस्व प्रस्थापित करून त्यांच्या वर्तनात बदल घडवून आणण्याची क्षमता राष्ट्राला राष्ट्रीय सत्तेद्वारे प्राप्त होते. त्याद्वारे संबंधित राष्ट्राला आपल्या हितसंबंधाचे रक्षण करणे शक्य होते. राष्ट्रीय सत्तेच्या आधारे इतर राष्ट्रांवर नियंत्रण ठेवता येते. त्यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात संबंधित राष्ट्राचा दर्जा सुधारतो.

**३) गतिमानता :**

राष्ट्रीय सत्तेच्या स्वरूपात सातत्याने बदल होत असतो. म्हणजेच राष्ट्रीय सत्तेचे स्वरूप गतिमान आहे. राष्ट्रीय सत्तेत सातत्याने वृद्धी किंवा घट होत असते. उदा. दुसऱ्या महायुद्धापूर्वी ब्रिटन हे राष्ट्र अत्यंत सामर्थ्यवान समजले जात होते. मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटनचा प्रभाव कमी झाला. याउलट पूर्वी फारसे सामर्थ्यवान नसणारे चीन हे राष्ट्र आता सामर्थ्यवान समजले जाते. महासत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

राष्ट्रांची सत्ता भविष्यात कायम राहतील याची शाश्वती नसते. उदा. सोव्हिएत युनियनला एकेकाळी महासत्ता समजले जात असे. मात्र सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर सोव्हिएत संघाचाही प्रभाव कमी झाला.

४) स्थल-काल सापेक्षता :

राष्ट्रीय सत्तेमध्ये स्थल-काल सापेक्षता आढळते. पूर्वी सामर्थ्यवान असणारे राष्ट्र नंतर दुर्बल ठरते. शिवाय इतर राष्ट्रांच्या तुलनेत काही राष्ट्रे सामर्थ्यवान किंवा दुर्बल ठरतात. म्हणजेच राष्ट्रीय सत्तेचे मापन करताना स्थल-काल सापेक्षतेचा विचार केला जातो. उदा. भारत हे राष्ट्र अमेरिकेच्या तुलनेत कमी सामर्थ्यवान आहे. मात्र श्रीलंकेच्या तुलनेत ते अधिक सामर्थ्यवान आहे.

५) विविध घटकांचा समावेश :

राष्ट्रीय सत्तेत विविध घटक समाविष्ट असतात. कोणतेही राष्ट्र आपल्या सत्तेसाठी केवळ एका घटकावर अवलंबून नसते. विविध घटकांचा एकत्रित प्रभाव राष्ट्रीय सत्तेवर पडत असतो. या घटकांमध्ये भौगोलिक परिस्थिती, आर्थिक विकास, तंत्रज्ञान, नेतृत्व इत्यादींचा समावेश होतो. राष्ट्रीय सत्ता अशा विविध घटकांवर अवलंबून असते. म्हणूनच ती मोजता येत नाही.

६) दोन राष्ट्रांच्या सत्तेत असमानता :

आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणत्याही दोन राष्ट्रांच्या सत्तेत समानता आढळत नाही. कारण राष्ट्रीय सत्ता अनेक घटकांवर अवलंबून असते. या घटकांच्या संदर्भात राष्ट्रांनुसार विविधता आढळते, परिणामी प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेतसुद्धा विविधता दिसून येते. म्हणूनच कोणत्याही दोन राष्ट्रांची सत्ता एकसमान नसते. याशिवाय सर्व राष्ट्रे आर्थिक विकासाच्या समान अवस्थेत नसतात. त्यांचे लष्करी सामर्थ्य एकसारखे नसते. म्हणूनच त्यांच्या सत्तेत भिन्नता असते.

◈ ३.२.३ राष्ट्रीय सत्तेचे घटक :

राष्ट्रीय सत्तेद्वारे एखाद्या राष्ट्राला इतर राष्ट्रांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करता येते. ही राष्ट्रीय सत्ता विविध घटकांवर अवलंबून असते. या घटकांचे मापन करता येत नाही. मात्र हे घटक सातत्याने बदलत असतात. हे घटक एकत्रितपणे राष्ट्रीय सत्तेवर प्रभाव पाडतात. या घटकांच्या प्रमाणानुसार एखाद्या राष्ट्राचे सामर्थ्य निर्धारित होते.

१) भौगोलिक परिस्थिती :

राष्ट्रीय सत्तेच्या दृष्टीने भौगोलिक परिस्थिती हा घटक महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक राष्ट्राला विशिष्ट अशी भौगोलिक परिस्थिती असते. ही परिस्थिती स्थिर स्वरूपाची असते. कारण त्यात विशेष बदल घडून येत नाही. प्राचीन काळापासून भौगोलिक परिस्थितीला राष्ट्रीय सत्तेचा घटक मानण्यात आले आहे. कारण भौगोलिक परिस्थितीनुसार राष्ट्राच्या विकासाची दिशा निर्धारित होत असते.

अ) आकारमान :

एखाद्या राष्ट्राच्या आकारमानानुसार त्या राष्ट्राचा भौगोलिक विस्तार निर्धारित होत असतो. काही राष्ट्रांचे आकारमान अतिशय मोठे असते. उदा. रशिया, चीन, अमेरिका, भारत इत्यादी. याउलट काही राष्ट्रांचे आकारमान अत्यंत लहान असते. उदा. मोनॅको, तुवालु, माले इत्यादी. मोठे आकारमान देशाच्या संरक्षणासाठी उपयुक्त ठरते. कारण अशा देशांवर आक्रमण करणे इतर राष्ट्रांना कठीण जाते. उदा. दुसऱ्या महायुद्धात जर्मन फौजांचे रशियावरील आक्रमण अयशस्वी ठरले. कारण रशियाचे आकारमान मोठे होते. मोठे आकारमान असलेल्या राष्ट्रात नैसर्गिक परिस्थितीमध्ये विविधता आढळते. परिणामी आर्थिक विकासासाठी अनेक

पर्याय उपलब्ध होतात. मात्र त्याचवेळी मोठे आकारमान असणाऱ्या राष्ट्रांना स्वसंरक्षणासाठी जास्त तरतूद करावी लागते.

**ब) भौगोलिक स्थान :**

एखाद्या राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावरून अनेक गोष्टी निर्धारित करता येतात. भौगोलिक स्थानाचा संबंध राष्ट्राच्या संरक्षणाशी असतो. काही वेळा विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे एखाद्या राष्ट्राला नैसर्गिक संरक्षण प्राप्त होते. शिवाय भौगोलिक स्थानानुसार राष्ट्राला आपल्या संरक्षणाची तरतूद करावी लागते. उदा. भारताच्या तीन बाजूंना समुद्र आहे. म्हणूनच भारताला आपले नौदल सामर्थ्यवान ठेवणे महत्त्वाचे ठरते. महत्त्वपूर्ण भौगोलिक स्थान प्राप्त झालेल्या राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित करता येते. प्रत्येक राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावरून त्याचे परराष्ट्र धोरण निर्धारित होते.

**क) हवामान :**

कोणत्याही राष्ट्रातील हवामानानुसार त्या राष्ट्रातील आर्थिक प्रक्रिया निर्धारित होत असतात. हवामानाच्या अनुकूलतेनुसार शेतात विविध पिके घेतली जातात. अनुकूल हवामान असणाऱ्या राष्ट्रांचा औद्योगिक विकास चांगल्या प्रकारे झालेला दिसतो. याउलट प्रतिकूल हवामान असणाऱ्या राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासात अडचणी निर्माण होतात. त्याचा राष्ट्रीय सत्तेवर परिणाम होतो.

**ड) सीमा :**

राष्ट्रीय सत्तेमध्ये राष्ट्रीय सीमांची भूमिका महत्त्वाची ठरते. कारण राष्ट्रीय सीमांनुसार राष्ट्राचे संरक्षण निर्धारित होत असते. उंच पर्वतरांगा, समुद्र अशा नैसर्गिक सीमा राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने फायदेशीर ठरतात. कृत्रिम सीमांवर युद्ध, अतिक्रमण असे धोके निर्माण होतात. एखाद्या राष्ट्राला समुद्रकिनारा लाभलेला नसेल तर त्या देशाला व्यापाराच्या दृष्टीने अनेक अडचणी येतात. त्यातून आर्थिक विकासाचा वेग कमी राहतो.

**इ) इतर वैशिष्ट्ये :**

नद्या, डोंगर, जमीन, पाणी ही कोणत्याही राष्ट्राची इतर भौगोलिक वैशिष्ट्ये आहेत. या घटकांचा विचार करून प्रत्येक राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरवावे लागते. सुपीक जमीन, पाण्याची उपलब्धता यामुळे शेतीचा विकास होतो. ज्या राष्ट्रांना समुद्रकिनारा लाभलेला असतो अशा राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय व्यापारात विकास होतो. याशिवाय या वैशिष्ट्यांमुळे राष्ट्राच्या संरक्षणालासुद्धा मदत होते.

**२) नैसर्गिक संसाधने :**

नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेनुसार राष्ट्रीय सत्तेचे स्वरूप निर्धारित होते. कोळसा, लोह, खनिज तेल, नैसर्गिक वायू इत्यादी खनिज संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्यास देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. जगातील विकसित राष्ट्रांचा विकास खनिज संपत्तीच्या उपलब्धतेमुळे झाला आहे. अर्थात केवळ खनिजसंपत्ती उपलब्ध असून भागत नाही. त्या खनिज संपत्तीचा योग्य वापर होणे आवश्यक असते. खनिज संपत्तीप्रमाणेच अन्नधान्याचे उत्पादनसुद्धा महत्त्वाचे ठरते. अन्नधान्याचे उत्पादन चांगले असल्यास इतर राष्ट्रांकडून त्याची आयात करावी लागत नाही. तसेच उद्योगधंद्यासाठी आवश्यक कच्च्या मालाचा पुरवठा करता येतो. त्यातून राष्ट्राचा आर्थिक विकास साधला जातो. म्हणूनच नैसर्गिक संसाधने हा राष्ट्रीय सत्तेचा महत्त्वाचा घटक आहे.

**३) लोकसंख्या :**

राष्ट्रीय सत्तेसाठी लोकसंख्या हा घटक महत्त्वाचा ठरतो. कारण लोकसंख्येमुळे राष्ट्राला मनुष्यबळ प्राप्त होते. त्यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राला दर्जा मिळतो. भरपूर लोकसंख्या असणाऱ्या राष्ट्रांना मोठे

सैन्यदल उभारणे शक्य होते. त्यातून राष्ट्राच्या संरक्षणाची हमी मिळते. मात्र राष्ट्राच्या लोकसंख्येची गुणवत्ता चांगली असायला हवी. लोकसंख्येचे आरोग्य उत्तम असणे गरजेचे असते. तसेच लोकसंख्येतून उपलब्ध होणारे मनुष्यबळ कुशल असायला हवे. अन्यथा राष्ट्राला अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्येला तोंड द्यावे लागते.

**४) तंत्रज्ञान :**

आधुनिक काळात विज्ञान-तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. तंत्रज्ञानाच्या आधारे विज्ञानाचा प्रत्यक्षात वापर करता येतो. म्हणून तंत्रज्ञानाची उपलब्धता राष्ट्रीय सत्तेसाठी महत्त्वाची ठरते. तंत्रज्ञानामुळे कृषी आणि औद्योगिक विकासाला चालना मिळते. त्यातून राष्ट्राचा आर्थिक विकास साधला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य वाढविता येते. त्यातून राष्ट्रीय सत्तेत वाढ होताना दिसते. अमेरिका आणि रशिया यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आधुनिक युद्ध तंत्रज्ञानामुळे या राष्ट्रांच्या सत्तेत वाढ झाली आहे. अत्याधुनिक युद्धसाधने उपलब्ध असणारी राष्ट्रे इतर राष्ट्रांना या साधनांचा पुरवठा करून त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करतात. त्यातून त्यांच्या सत्तेत वाढ होते.

**५) आर्थिक विकास :**

आर्थिक विकासामुळे राष्ट्राची प्रगती होते. म्हणूनच सर्व राष्ट्रे आर्थिक विकासासाठी प्रयत्नशील असतात. ज्या राष्ट्रांचा आर्थिक विकास चांगल्या प्रकारे झालेला असतो ती राष्ट्रे सामर्थ्यवान ठरतात. याउलट दारिद्र्य, गरिबी यांचे प्रमाण जास्त असणारी राष्ट्रे दुर्बल समजली जातात. अशा राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात फारसे महत्त्व दिले जात नाही. त्यांच्या मतांना फारशी किंमत नसते. आर्थिकदृष्ट्या विकसित राष्ट्रे दुर्बल राष्ट्रांना आर्थिक साहाय्य करतात आणि त्यांचे मत आपल्यासाठी अनुकूल करून घेतात.

**६) औद्योगिक विकास :**

औद्योगिक विकासाद्वारे आर्थिक विकास साधला जातो. म्हणूनच राष्ट्रीय सत्तेसाठी औद्योगिक विकास हा घटक महत्त्वाचा ठरतो. इंग्लंड, जपान यासारख्या राष्ट्रांचा औद्योगिक विकास झाल्यामुळे त्यांचा आर्थिक विकास जास्त झाला आहे. औद्योगिक विकासामुळे राष्ट्रातील उत्पादनात वाढ होते. शिवाय युद्ध साहित्याची निर्मिती करून राष्ट्राला युद्धसज्ज बनविता येते.

**७) विचारप्रणाली :**

विचारप्रणाली हा राष्ट्रीय सत्तेचा अविभाज्य भाग असतो. विचारप्रणालीमुळे अनेक बदल घडून येऊ शकतात. विचारप्रणालीच्या आधारे राष्ट्रातील नागरिकांच्या मनात ऐक्याची भावना निर्माण करता येते. त्याद्वारे राष्ट्रीय सत्ता वृद्धींगत होते. उदा. २० व्या शतकात साम्यवादाच्या आधारे सोव्हिएत युनियन हे राष्ट्र एक महासत्ता म्हणून उदयास आले. मात्र काही वेळा अयोग्य विचारप्रणालीमुळे राष्ट्रीय सत्ता कमजोर होऊ शकते. हिंसाचारासारख्या अवैध मार्गांना चालना देणाऱ्या विचारप्रणालंमुळे राष्ट्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. नक्षलवाद, धार्मिक, कट्टरवाद, दहशतवाद इत्यादी विचारप्रणालींमुळे राष्ट्राचे नुकसान होते आणि राष्ट्रीय सत्ता कमजोर होते.

**८) नेतृत्व :**

राष्ट्राच्या संदर्भाती महत्वाचे निर्णय हे राष्ट्राच्या नेतृत्वामार्फत घेतले जातात. म्हणूनच नेतृत्वाच्या गुणवत्तेनुसार राष्ट्राच्या सत्तेचे प्रमाण निर्धारित होत असते. चांगले नेतृत्व सर्व घटकांचा योग्यप्रकारे उपयोग करून राष्ट्रीय सत्ता बळकट करते. चांगल्या नेतृत्वाच्या आधारे प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते. याउलट सर्व

परिस्थिती अनुकूल असेल आणि राष्ट्राचे नेतृत्व चांगले नसेल तर राष्ट्रीय सत्ता कमजोर ठरते. चांगले नेतृत्व राष्ट्राच्या विकासात सामान्य जनतेला सहभागी करून घेते. त्यातून राष्ट्राचा सर्वसमावेशक विकास साधला जातो. चांगल्या नेतृत्वामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राची प्रतिमा उंचावते आणि राष्ट्राचा दर्जा सुधारतो.

९) राष्ट्रीय चारित्र्य :

राष्ट्रीय चारित्र्य हा राष्ट्रीय सत्तेचा ऐतिहासिक समाजशास्त्रीय आणि मानसिक स्वरूपाचा घटक आहे. त्यातून राष्ट्राची ऐतिहासिक परंपरा आणि सामाजिक मानसिकता प्रतीत होते. जनतेच्या गुणवैशिष्ट्यांमधून राष्ट्रीय चारित्र्य साकार होत असते. राष्ट्रातील सामान्य लोकांमध्ये बुद्धिमत्ता, नैतिकता असेल, ते दृढनिश्चयी असतील तर राष्ट्रीय सत्तेत वाढ होताना दिसते. राष्ट्राचे नेतृत्व राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते.

१०) नीतिधैर्य :

राष्ट्रीय सत्ता वृद्धिंगत होण्यासाठी राष्ट्रातील लोकांचे नीतिधैर्य अतिशय महत्त्वाचे ठरते. युद्ध, शांतता, परराष्ट्र धोरण अशा विविध परिस्थितीमध्ये लोक कशाप्रकारे पाठिंबा देतात यावर लोकांचे नीतिधैर्य अवलंबून असते. लोकांच्या राष्ट्रनिष्ठेतून हे नीतिधैर्य होते. अनुकूल किंवा प्रतिकूल अशा कोणत्याही परिस्थितीत ही नीतिधैर्य टिकून रहावे लागते. अन्यथा राष्ट्रीय सत्तेत घट होत जाते.

## ३.३ राष्ट्रीय सत्तेचे बदलते स्वरूप (Changing Nature of the National Power)

आपले हितसंबंध जपण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला सत्तेची गरज असते. राष्ट्रीय सत्तेच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. सत्तेअभावी राष्ट्राचे अस्तित्व धोक्यात येते. पूर्वीच्या काळी राष्ट्रीय सत्ता ही राष्ट्रीय नेतृत्वाच्या हातात एकवटलेली असे. मात्र आधुनिक काळात सत्तेच्या स्वरूपात बदल होत आहे.

१) माहिती-तंत्रज्ञानाचा स्वीकार :

आधुनिक काळात जवळपास सर्वच राष्ट्रांनी माहिती-तंत्रज्ञानाचा स्वीकार केलेला दिसून येतो. माहिती-तंत्रज्ञानाच्या विकासावरून राष्ट्राच्या प्रगतीचे प्रमाण निश्चित केले जाते. माहिती-तंत्रज्ञानामुळे विविध कार्यात तत्परता आणि पारदर्शकता येते. परिणामी राष्ट्रांतर्गत प्रक्रिया जलदपणे घडून येतात. त्यातून राष्ट्रीय सत्तेत वाढ होते. माहिती-तंत्रज्ञानाच्या स्वीकारामुळे राष्ट्रीय सत्तेचे केंद्रीकरण होताना दिसत आहे.

२) शासन आणि बिगर सरकारी घटक :

पूर्वी राष्ट्रीय सत्ता ही शासनाची मक्तेदारी होती. मात्र आधुनिक काळात बिगर सरकारी घटकांचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. या घटकांमध्ये सामाजिक संस्था, बिगर सरकारी संस्था, दबाव गट, आंतरराष्ट्रीय संघटना यांचा समावेश होतो. आधुनिक काळात या घटकांवर लोकांना विश्वास निर्माण झाला आहे. म्हणूनच राष्ट्रीय सत्तेत या घटकाचा विचार करणे अपरिहार्य ठरले आहे.

३) प्रसारमाध्यमांचा प्रभाव :

आधुनिक काळात प्रसारमाध्यमांचा प्रभाव वाढला आहे. त्यामुळे राष्ट्रीय सत्तेत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. भ्रष्टाचार, गैरव्यवहार इत्यादी समस्या प्रसारमाध्यमांनी उचलून धरल्या. दहशतवादासारख्या

गंभीर समस्यांना प्रसारमाध्यमांमुळे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय सत्तेसाठी अनुकूल जनमत तयार करण्यात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**४) शासनव्यवस्थांचा संघर्ष :**

आधुनिक काळातील शासनव्यवस्थांच्या संघर्षांमुळेसुद्धा राष्ट्रीय सत्तेचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी अनेक राष्ट्रांमध्ये हुकूमशाही अस्तित्वात होती. परिणामी हुकूमशहांच्या हातात राष्ट्रीय सत्तेचे केंद्रीकरण झाले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केला. परिणामी राष्ट्रीय सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यास सुरुवात झाली. राष्ट्रीय सत्तेत सामान्य जनतेचा सहभाग वाढला. राष्ट्रातील नेतृत्वाला लोकमत विचारात घेणे अपरिहार्य झाले. त्यातून राष्ट्रीय सत्तेच्या स्वरूपात अमूलाग्र बदल घडून आले.

**५) २१ वे शतक :**

२१ व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणात केवळ अमेरिका ही महासत्ता शिल्लक राहिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यामुळे इतर राष्ट्रांना आपले परराष्ट्र धोरण आखताना अमेरिकेच्या सामर्थ्याचा विचार करावा लागतो. काही राष्ट्रांना आपल्या सत्तेच्या संदर्भात अमेरिकेची मनमानी सहन करावी लागते. कारण अमेरिकेकडे आधुनिक युद्धसामग्री उपलब्ध आहे.

**६) औद्योगिकीकरण :**

१७ व्या शतकात घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. औद्योगिकीकरणामुळे राष्ट्रीय सत्तेच्या स्वरूपात बदल झाला. जागतिकीकरण, खासगीकरण या प्रक्रिया राष्ट्रीय सत्तेचा अविभाज्य भाग बनल्या. परराष्ट्र धोरणातील काही निर्णय हे औद्योगिकीकरणाला अनुसरून घेतले जातात. औद्योगिकीकरणानंतर युद्ध साहित्याच्या निर्मितीत वाढ झाली.

◈◈◈

**सरावासाठी प्रश्न**

**प्र. १. खालील प्रश्नांची २५० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय सत्तेचे बदलते स्वरूप स्पष्ट करा. (Refer Point 3.3)

२. राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना स्पष्ट करून राष्ट्रीय सत्तेची वैशिष्ट्ये सांगा. (Refer sub Points 3.2.1 & 3.2.2)

**प्र. २. खालील प्रश्नांची ५०० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय सत्तेचे घटक स्पष्ट करा. (Refer Sub Point 3.2.3)